# सनविवि

जुलै
२०२०

महाराष्ट्र मंडळ बंगलोर



प्रकाशक :

महाराष्ट्र मंडळ, बंगळुरू
#२८, २ रा क्रॉस, गांधीनगर
बंगळुरू- ५६०००९
ई-मेल:
snvv.mmbangalore@gmail.com

संपादक मंडळ :

-प्रवरा संदीप

-धनंजय चौगुले

-पल्लवी प्रसाद

तंत्र सहाय्य्य:

-संदीप लिमये

स्पष्टीकरण:

या अंकात प्रसिद्ध झालेल्या साहित्यात व्यक्त झालेले विचार व मते ही त्या त्या लेखकांची वैयक्तिक असून महाराष्ट्र मंडळ त्यास जबाबदार नाही. तसेच हे मासिक विक्रीसाठी नाही.

# अनुक्रमणिका

--संवाद

--मदतीसाठी आवाहन

--घडामोडी

--दारची फुले

# संवाद...

*मंडळी ,*

*सप्रेम नमस्कार ..*

*यंदा आपल्या मंडळाचं शतकपूर्तीचं वर्ष .आपल्या उत्साही आणि कार्यक्षम कार्यकारिणीने , रसिकांसाठी खूप उत्तमोत्तम कार्यक्रम सादर करण्याचे बेत केले होते .. पण सगळ्या जगाला संकटात टाकणाऱ्या करोना मुळे टाळेबंदी अपरिहार्य झाली , आणि सगळ्या बेतांवर पाणी पडलं .. असं असलं तरी आमच्या उत्साहावर मात्र आम्ही पाणी पडू दिलं नाही हं ! तुमच्या सारख्या रसिकांची प्रत्यक्ष भेट काही काळ शक्य नसली , तरी online कार्यक्रमांतून नक्कीच भेटीगाठी होत राहतील ! या वर्षी श्री गणेशोत्सवातील लहान मोठे कार्यक्रम , स्पर्धा , सगळं काही online माध्यमांद्वारे सादर करण्याचा कार्यकारिणीचा मानस आहे ... अर्थातच तुमच्या उदंड प्रतिसादाची , आम्ही अपेक्षा बाळगून आहोत .*

*गणपति उत्सवातल्या इतर स्पर्धांची माहिती ऑगस्टमधल्या 'गणेशोत्सव पूर्वरंग ' या आपल्या तयारी विशेष अंकातून , तसंच फेसबुकच्याही माध्यमातून आम्ही देऊ , so , stay tuned ..*

*या अंकात आपल्याला सनविवि आयोजित साहित्य स्पर्धांची माहिती देतो आहोत . गेल्या वर्षीप्रमाणे याही वर्षी या स्पर्धांना तुमचा भरपूर प्रतिसाद येईल , ही आशा आहे .*

*प्रवरा संदीप.*

https://www.facebook.com/MMBlr.org/

*सर्वांनी काळजी घ्या आणि सुरक्षित रहा !!!*

*धन्यवाद...*
*महाराष्ट्र मंडळ, बंगलोर*

# नवीन कार्यकारणी

*५ जुलै रोजी ऑनलाईन AGM झाली. मार्च २०२१ पर्यंत काम करण्यासाठी खालील कमिटी बिनविरोध निवडून आली.*

## महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी - २०२०-२०२१

**अध्यक्ष** *: रेखा नाईक*

**उपाध्यक्ष** *: संदीप लिमये*

**कोषाध्यक्ष / खजिनदार :** *सुजय घोरपडकर*

**सचिव :** *वीणा कवठेकर*

**उप सचिव :** *ओंकार संगोराम*

**सल्लागार :** *श्रीकांत आपटे*

**सदस्य :**

- *ऋता दीक्षित*
- *मधुरा परुळेकर*
- *शशिशेखर चौगुले*
- *रुपाली मेहेंदळे*
- *वैशाली तोरवी*
- *प्रसाद तोरवी*
- *मंजिरी टोळ*
- *सुचित्रा खांडेकर*
- *पूजा तांबे*

**Co- opt सदस्य**

- *पूजा सोनावणे जोशी*
- *समीर प्रधान*
- *विद्या पाध्ये*

**स न वि वि संपादक मंडळ**

*-प्रवरा संदीप*

*-धनंजय चौगुले*

*-पल्लवी प्रसाद*

# घडामोडी...

*अक्षरे जोडिता शब्द होती ।*

*शब्दांच्या समुहे वाक्ये बनती ।।*

*वाक्यातुनी प्रकटते भावना ।*

*चला सुखवूया साऱ्या जना ।।*

*अश्याच तुमच्या भाव भावना प्रकट करण्यासाठी सालाबादाप्रमाणे स न वि वि च्या साहित्य स्पर्धा घोषित करत आहोत.*

*ह्या स्पर्धेकरिता आम्ही मंडळांच्या सभासदांबरोबरच , इतरांनाही आमंत्रित करत आहोत .सभासदेतर स्पर्धकांसाठी प्रवेश शुल्क : रुपये १००/- प्रति एन्ट्री*

**सभासदेतर स्पर्धकांना सूचना** *: इ मेल द्वारे साहित्य पाठवताना मेलमध्ये , आपलं पूर्ण नाव , पत्ता व प्रवेश शुल्क भरल्याचा स्क्रीन शॉट जोडणे आवश्यक आहे.*

**प्रवेश शुल्कासाठी बँक डिटेल्स :** **Bank of Maharashtra, Gandhinagar Branch A/c # 20051923189, IFSC Code : MAHB0000428**

*सध्याच्या कठीण काळात, सकारात्मकता हा एकच गुण , आपल्याला खंबीरपणे उभे ठेऊ शकतो, त्यामुळे ह्यावर्षीच्या मंडळाच्या कार्यक्रमाची थीम "सकारात्मकता " हि ठरवण्यात आलेली आहे . त्यासाठी सर्व लिखाण त्या अनुषंगाने असावे असे अपेक्षित आहे.*

*ह्या लेखनस्पर्धेचे दोन विभाग करण्यात आले आहेत.*

**गद्यविभाग :**

**स्फुट लेखन** *: (शब्दमर्यादा : ५०० )*

*अ )स्वदेशीचा आग्रह असावा, दुराग्रह नको*
*ब )जे खळांची व्यंकटी सांडो*
*क )आकाशी झेप घेरे पाखरा*

**कथा** *(शब्दमर्यादा : ७५० )*

**पद्यविभाग :**

**<u>शब्दकाव्य</u>** *(शब्द वापरून कविता)*

*अ )भरारी ,*

*ब ) शौक ,*

*क )यत्न*

**<u>स्वैर अनुवाद :</u>** *(आपल्याला आवडलेल्या इतर भाषेतल्या कवितेचा अनुवाद )*

*साहित्य पाठविण्याची अंतिम तारीख : १५ ऑगस्ट २०२०*

*लेखनपाठवण्यासाठी मेल :* snvv.mmbangalore@gmail.com

**पारितोषिके :**

*गद्य विभाग : प्रथम : रू १०००/-*

*द्वितीय :रु ७५०/-*

*तृतीय : ५००/-*

*पद्य विभाग : प्रथम : रू १०००/-*

*द्वितीय :रु ७५०/-*


*तृतीय : ५००/-*

*इतर स्पर्धांसाठी पूर्वरंग येईलच ,* **So watch this space for the same.**

∞∞∞∞∞∞∞∞




हा कार्यक्रम महाराष्ट्र मंडळाच्या FB आणि website वर बघता येईल. त्यासाठी खालीलपैकी एक लिंक वापरता येईल. https://www.facebook.com/MMBlr.org/ -http://www.mmbangalore.org/




*२. महाराष्ट्र मंडळ पूर्व शाखा आयोजित करत आहे -* **"एक पाऊल आर्थिक आत्मनिर्भरतेकडे"***सादरकर्ते श्री. समीर बापट*
*दिनांक २६ जुलै रोजी संध्याकाळी ५.३० वाजता मंडळाच्या वेबसाईट वर ह्या कार्यक्रमाचे live प्रक्षेपण होईल*

*३. ह्या वर्षी शताब्दी वर्षातील गणेशोत्सव आपण आनंदोत्सव म्हणून साजरा करणार आहोत. ज्याप्रमाणे दरवर्षी गणेशोत्सवादरम्यान महाराष्ट्र मंडळ विविध कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन करते त्याचप्रमाणे ह्यावर्षी देखील करणार आहे, फक्त सर्व कार्यक्रम व स्पर्धा online असतील आणि त्यमुळे त्यांचे स्वरुप थोडे वेगळे असेल.*
*त्याची सविस्तर माहिती ऑगस्ट महिन्यातील अंकात देऊ.*

# दारची फुले...

## सकाळ

*गडद गुडुप्प अंधाराची, कडा केशरी नकळत झाली |*
*लटक्या रागाने अवनीने , धुके ओढुनी कुस बदलली | |*

*काळा पडदा आणखी सरकला, सुवर्ण झाली प्रभा केशरी |*
*काजव्यांचे लपले पाचु, चमके दवबिंदु सोनेरी ||*

*चराचरावर उधळीत सोने, रविकिरणे चौफेर विखुरली |*
*प्रसन्न वदने सजली अवनी, अरुण रथावर स्वारी आली||*

*--ओंकार संगोराम .*

# एका  कलाकाराची आत्महत्या

तो खरं तर केव्हाच मेला होता.

रोजच्या जगण्यात तिळातिळाने मरत होता
सकाळी उठून लोकल-बसच्या गर्दीत, रिक्षा-टॅक्सीच्या रांगेत,
ट्रॅफिकमध्ये अडकलेल्या दुचाकी-चारचाकीत...
तो खरं तर केव्हाच मेला होता.

कम्प्युटरसमोर बसल्यावर डोळे फाडफडून स्क्रीनकडे बघताना
आधी त्याची नजर मेली,
तो खरं तर तेव्हाच मेला होता

-कधीतरी खुणावायचे त्याला स्वर-ताल, वृत्त-अलंकार, रंग-रेषा वगैरे,
साद घालायचे रविशंकर, झाकिर, पुल, पिकासो, चार्ली चॅप्लिन वगैरे...
पण MS Outlook मधून तेवढ्यात डोकवायचं कुठलंतरी meeting invite
हळूहळू त्याचा जगण्याचा outlookच बदलून गेला...
आताशा म्हणे त्याचा उजवा मेंदू निरुपयोगी झाला होता,
तो खरं तर तेव्हाच अर्धमेला झाला होता.
-"संध्याकाळी भेटू उजव्या मेंदूला" म्हणत तो घरी यायचा,
रविशंकर, झाकिर, पुल, पिकासो, चार्ली चॅप्लिन वगैरेंशी गप्पा मारायला,
एखादं राहून गेलेलं फेसबुक/इन्स्टा लाईव्ह बघायला...
तेवढ्यात कावकाव करायची पोटातली भूक,
ती शमवल्यावर ठणठण करायची सिंकमधली भांडी...
रविशंकर, झाकिर, पुल, पिकासो, चार्ली चॅप्लिन वाट बघून झोपून जायचे
पण तो काही यायचा नाही

खूप उशीरा तोही बळेच स्वतःसाठी झोप ओढून घ्यायचा
तो खरं तर तेव्हाच मेला होता.
-आज शेवटी पोलीस आले त्याच्या घरी,पंचनामा केला
आणि जाहीर केलं की झोपेच्या गोळ्यांच्या अतिसेवनातून तो मेला
तो तंद्री लागल्यासारखा दिसत होता
कारण बहुधा मागे अखंड लूपवर चालणारी रविशंकरांची सतार होती
सतारीचं ते दिडदा ऐकत प(हु)डलेला हा बहुधा पहिलाच मुडदा
पोलिसांनी नोंद आत्महत्येची केली
कारण बिचाऱ्यांकडे आत्म्याच्या हत्येची नोंद करायची सोय नव्हती.
-रविशंकर, झाकिर, पुल, पिकासो, चार्ली चॅप्लिन अजूनही वाट बघत होते
पण जगायचा प्रयत्न करताना रोज थोडा थोडा करत
तो कलाकार मात्र केव्हाच मेला होता

- कौस्तुभ दीक्षित

